# अपर जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे कार्यालय

रा.मा.क्र. ३९ / एन.ए.पी-३४/२०१७-२०१८
मौजा- दिग्रस ता. दिग्रस जि.यवतमाळ

आवेदक :- १) श्रीमती खुर्शीद बानो सै. मुर्तीजा २) सौ. रश्मी संजय बंग
३) सौ. सुजाता निखील महिंद्रे (पाटील) सर्व रा. दिग्रस ता. दिग्रस

## आदेश

**(पारीत दिनांक ७ / ३ /२०१८)**

मौजा दिग्रस ता दिग्रस येथील स.नं/गट नं. २०/२ मधील क्षेत्र ०.३४ हे. आर. व १.२२ हे. आर. एकुण क्षेत्र १.५६ हे.आर, भोगवटदार वर्ग १ शेतजमीन निवासी प्रयोजनाकरीता अकृषीक करण्याची परवानगी मिळणेबाबत आवेदक, १) श्रीमती खुर्शीद बानो सै. मुर्तीजा २) सौ. रश्मी संजय बंग ३) सौ. सुजाता निखील महिंद्रे (पाटील) सर्व रा. दिग्रस ता. दिग्रस यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४४ (१), खाली या कार्यालयांत दि.७/१२/२०१७ रोजी विहीत नमुन्यात आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर केला असून सदर प्रकरणात आवेदक यांनी सदर शेत जमीन निवासी प्रयोजनासाठी अकृषक परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

प्रकरणात अकृषक परवानगी देण्यासंबंधी या कार्यालयाचे पत्र क्रमांक/अका/अकृषीक/कावि/ ११७७/२०१७/दिनांक ८/१२/२०१७ अन्वये सहाय्यक संचालक नगर रचना यवतमाळ, कार्यकारी अभियंता, सा.बां.वि. दिग्रस, कार्यकारी अभियंता. जि.प.यवतमाळ, कार्यकारी अभियंता, मरा.वि.वि.कं. दिग्रस, जिल्हा आरोग्य अधिकारी, यवतमाळ,भुजल सर्वेक्षण अधिकारी, यवतमाळ , प्रादेशिक अधिकारी,म.औ.वि.महामंडळ, अमरावती, तहसिलदार, यवतमाळ, मुख्याधिकारी, नगर परिषद, दिग्रस, कार्यकारी अभियंता, जीवन प्राधिकरण, बांधकाम विभाग यवतमाळ, भारस्थ अधिकारी, भुसंपादन, यवतमाळ, कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, यवतमाळ, कार्यकारी अभियंता, इ.एच.व्हि.टी. अमरावती या संबधित कार्यालयाचे अभिप्राय मागविण्यात आले, तसेच प्रकरणात दिनांक ८/१२/२०१७ रोजी जाहीरनामा काढण्यात आला व त्यामध्ये वरील जमीनी बाबत हितसंबध असणा-या ज्या व्यक्तींना आक्षेप व हरकती घ्यावयाच्या असतील त्यांनी एक महीन्याचे आंत किंवा तत्पूर्वी त्यांचे कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावे असे सुचित करण्यात आले होते. व या तारखेनंतर आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही असेही स्पष्ट करण्यात आले होते. प्रकरणात मुदतीत कोणचाही आक्षेप प्राप्त झाला नाही.

ज्याअर्थी उक्त प्रकरणात संबंधित विभागांनी खालील प्रमाणे अभिप्राय प्रकरणात सादर केलेले आहे.

सहाय्यक संचालक, नगर रचना, यवतमाळ यांनी त्यांचे पत्र जा.क्र/रुपांतरण/मौ.दिग्रस, ता. दिग्रस /स.नं.२०/२ पै/ससंनरय/२५० दिनांक- २६/२/२०१८ नुसार मौजा दिग्रस ता दिग्रस येथील स.नं/गट नं. २०/२ मधील क्षेत्र ०.३४ हे. आर. व १.२२ हे. आर. एकुण क्षेत्र १.५६ हे.आर, भोगवटदार वर्ग १ जमिनीचे प्रस्तावित अभिन्यासाला खालील अटी व शर्तीवर मंजूरी देण्याची आणि अभिन्यासाखालील जागेचा वापर निवासी प्रयोजनासाठी अंतीम मंजूरीची शिफारस केली आहे.

१) अभिन्यासातील खुली जागा,रस्ते व सार्वजनिक सुविधेसाठी प्रस्तावित भूखंडाव्यतिरिक्त ईतर भूखंडाचा उपयोग रहीवास वापराकरिताच करण्यात यावा.

२) भविष्य काळात अभिन्यासातील भूखंडाचे पूर्वपरवानगी शिवाय विभाजन करु नये.

३) अभिन्यासातील सर्व रस्ते "अ" "ब" व "क" वर्ग नगर परिषदेस लागु असलेल्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मधील नियम क्रं.१३.२.३.३ नुसार आवेदकांचे स्वखर्चाने विकसीत करुन रु १/- इतक्या नाममात्र किंमतीवर स्थानिक प्राधिकरणाकडे व्यवस्थापनेसाठी हस्तांतरीत करणे बंधन कारक राहील.

४) "अ" "ब" व "क " वर्ग नगर परिषदेस लागू असलेल्या बांधकाम नियंत्रण नियमावलीमधील नियम क्र. १३.३.२ मधील तरतुदीनुसार खुल्या जागेचा विकास करणे बंधनकारक राहील.

५) अभिन्यासातील विद्युत दाब वाहीनीची आखणी आवेदकाने स्वखर्चाने रस्त्याच्या बाजूने करुन घ्यावी . अभिन्यासातील जागेमधून जाणाऱ्या विद्युत वाहिनी स्थलांतरीत न केल्यास अथवा अन्य बाबतीत विद्युत वाहिनीने बाधीत भुखंडावर बांधकाम करताना व वापर करताना काही अपघात अथवा जिवीत हानी झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

६) अभिन्यासातील भूखंडात बांधकाम करतांना **अ ब व क** वर्ग नगरपरिषदांना लागू असलेल्या बांधकाम विषयक नियमांचे पालन करावे.

७) इतर बाबतीत स्थानिक प्राधिकरणाच्या नियमांचे पालन करावे व स्थानिक प्राधिका-यांच्या पूर्व परवानगीशिवाय कोणतेही बांधकाम करु नये.

१०) महाराष्ट्र लॅण्ड रेव्हेन्यू रुल्स, १९६९ (जमिनीच्या वापरातील बदल व अकृषक कर आकारणी) च्या कलम-४ च्या अटीचे पालन करावे.

११) अभिन्यासाच्य हद्दी, क्षेत्रफळ हे भुमी अभिलेख खात्याने प्रमाणित केलेल्या सिमांकित मोजणी नकाशा मो.र.क्र. नं. ०९ /नियमित पोटहिस्सा/दिग्रस/२०१७ दि. ५/९/२०१७ आहेत, यामध्ये अभिन्यासाच्या हद्दी व क्षेत्रफळाच्या फावत अथवा कसही वाद उपस्थित झाल्यास ही शिफारस रद्द समजण्यात येईल.

१२) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम-१९६६ चे कलम १२४ अन्वये **नगर परिषद दिग्रस** यांचेकडे विकास शुल्काचा भरणा करणे आवश्यक राहील.

१३) सदर अभिन्यासातील भु.क्र. ८ ते १४ हे. Row Housing असल्याने, त्यानुसार बांधकाम करणे बांधनकारक राहील.

कार्यकारी अभियंता सा बा विभाग , पुसद यांनी त्यांचे पत्र दि २२/१२/२०१७ अन्वये सदर शेत जमीन मानोरा -दिग्रस-दारव्हा रा.प.मा.१६१ A च्या बाजुला असल्यामुळे खालील अटींच्याअधीन राहून सदर विषयाकींत जमीन अकृषक करण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे.

१) प्रस्तावित जमीन रा प मा.१६१ A च्या बाजुला असल्यामुळे विषयांकित प्रस्तावामध्ये १२ मिटरचा समांतर सेवा रस्ता आवश्यक आहे. त्याशिवाय अकृषक करण्याची परवानगी देण्यात येऊ नये.

२) प्रस्तावित जमीन ही मानोरा-दिग्रस रा.प.मा. च्या बाजुला असल्यामुळे राष्ट्रीय महामार्गापासून मार्गाच्या मध्यापासून ४० मिटर पर्यंत कोणत्याही स्वरुपाचे पक्के बांधकाम करण्यात येऊ नये.

३) रामा/प्रजिमा मार्गाच्या मध्य रेषेपासून ७५ मिटर अंतरापर्यंत या खात्याची पुर्व परवानगी घेतल्याशिवाय १३ मिटर पेक्षा अधीक उंचीचे बांधकाम करण्यात येऊ नये.

४) पोचमार्गावर मोरीचे बांधकाम कमीत कमी ८०० मीमी व्यासाच्या पाईप वापरुन करण्यात यावे तसेच पोचमार्गाची उंची रामा मार्गाच्या उंची पेक्षा जास्त असू नये.

५) राम मार्गाच्या वाहतुकीस कोणत्याही प्राकरचा अडथळा येणार नाही याची दक्षता घेण्यास यावी.

६) वरील परवानगी आपण मालकी हक्काबाबत पुर्ण पडताळणी केली समजून व तसेच सदर जमीनी बाबत असलेल्या न्यायालयीन प्रकरणात न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून अकृषक बाबतची परवानगी देण्यास हरकत नाही.

७) इमारत रेषेचे पालन व्हावे म्हणून Marginal Space सोडलेली आहे यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करता येणार नाही.

मुख्याधिकारी नगर परिषद, दिग्रस यांनी त्यांचे पत्र क्रमांक/बांधकाम विभाग/नपदि/८४९/२०१८ दिनांक ६/१/२०१८ अन्वये खालील अटीवर अकृषक करण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे.

१) अभिन्यास अकृषीक झाल्यानंतर त्यास न.प.ची मान्यता घ्यावी

२) अभिन्यासातील रस्ते, नाल्या विकसीत करुन न.प.कडे खुल्या जागेसह पुढील देखभालीसाठी विनामुल्य हस्तांतरीत कराव्यात.

३) नियमानुसार होणारा विकास शुल्क न.प.कडे नगदीने भरावा लागेल.

४) अभिन्यासातील प्लॉट धारकांना पिण्याचे पाण्याची व्यवस्था करावी लागेल.

५) अभिन्यासातील कोणत्याही भूखंडाचे विभाजन करुन विक्री व्यवहार करता येणार नाही. त्यास सक्षम प्राधिकरणाची मंजूरी घेणे बंधनकारक राहील.

६) अभिन्यासातील रस्त्याच्या कडेला विहीत अंतरावर पथदिव्याची व्यवस्था करण्याची जबाबदारी अभिन्यास धारकाची राहील.

७) अभिन्यासातील रस्त्याचे दोन्ही बाजूने प्रत्येकी १० मी.अंतरावर १ झाड याप्रमाणे वृक्षारोपन करावे व सदहू वृक्ष जगविण्याची जबाबदारी अभिन्यास धारकाची राहील.

८) अभिन्यासातील कोणतेही विकास काम करावयाचे असल्यास नगर परिषदेची पुर्व परवानगी घेणे बंधनकारक राहील.

९) सदर अभिन्यासाला लागुन विकास आराखडयामध्ये १२ मिटर डी.पी. रोड दर्शविले आहे . सदर आरक्षण वगळून अभिन्यास अकृषीक करण्यास परवानगी देण्यास हरकत नाही.

१०) अंतिम मंजुरी पुर्वी अभिन्यासातील रस्ते, नाल्या व इतर नागरी सुविधा करणे अभिन्यास धारकांस बंधन कारक राहील.

कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्या पुसद यांनी त्यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक दिनांक १२/८/२०१७ अन्वये सदर जमीन अकृषक करण्यास हरकत नसल्याचे कळवविले आहे.

वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, यवतमाळ यांनी त्यांचे पत्र दिनांक २९/१/२०१८ अन्वयें अकृषिक परवानगी देण्यास हरकत नसल्याचे कळविले आहे.

जिल्हा आरोग्य अधिकारी यवतमाळ यांनी त्यांचे पत्र दि ८/२/२०१८ अन्वये सदर क्षेत्र निवासी वापरा करीता अकृषक मध्ये परावर्तीत करण्यांस नाहरकत कळविले आहे

भारस्थ अधिकारी भु संपादन जि का यवतमाळ यांनी त्यांचे पत्र दि.२६/२/२०१८ अन्वये सदर शेत जमीनीचे संपादना बाबतचे प्रकरण प्रलंबित अथवा सुरु नसल्याचे कळविले आहे.

तहसिलदार, दिग्रस यांनी त्यांचे पत्र दिनांक १०/१/२०१८ अन्वये स्थळ निरीक्षण अहवालासह सदर

कार्यकारी अभियंता जिवन प्राधिकरण, यवतमाळ,कार्यकारी अभियंता, ई.एच.व्ही. अमरावती,प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्यौगीक विकास महामंडळ, अमरावती ,कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग यवतमाळ, उपविभागीय अधिकारी, पुसद यांना पत्रव्यवहार करुन सुध्दा त्यांचे अभिप्राय प्राप्त झाला नाही त्याअर्थी त्यांची प्रकरणात संमती गृहीत धरण्यात येत आहे.

वरील सर्व मुद्दे विचारात घेता आवेदकांनी निवासी प्रयोजनाकरीता मागीतलेली परवानगी देण्यास हरकत नाही. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ चे कलम ४४ (१) व शासनाचे व महाराष्ट्र शासन महसूल व वन विभागाचे परिपत्रक क्रमांक-एन.ए.पी.-१०८८/प्रक्र १२७५/सी.आर-१९/ल-२/ दिनांक १२.१०.१९८८ नुसार मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये, मी अपर जिल्हाधिकारी, यवतमाळ आवेदक १) श्रीमती खुर्शीद बानो सै. मुर्तीजा २) सौ. रश्मी संजय बंग ३) सौ. सुजाता निखील महिंद्रे (पाटील) सर्व रा. दिग्रस ता. दिग्रस यांना मौजा दिग्रस ता दिग्रस येथील स.नं/गट नं. २०/२ मधील क्षेत्र ०.३४ हे. आर. व १.२२ हे. आर. एकुण क्षेत्र १.५६ हे.आर,जमीन निवासी प्रयोजनाकरीता खालील अटी व शर्तीवर अकृषक परवानगी मंजूर करण्यात येत आहे.

१) मंजूर करण्यात आलेली अकृषीक परवानगी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ व त्या नियमांचे तरतुदीला धरुन असेल.

२) आवेदकास अकृषीक परवानगी ज्या प्रयोजनाखाली मंजूर करण्यात आली त्याच प्रयोजनाकरीता जागेचा वापर करावा.जागेचा किंवा इमारतीचा काही भाग दुस-या प्रयोजनाकरीता उपयोग घ्यावयाचा असल्यास सक्षम अधिका-याची परवानगी घेऊनच वापर करावा.

३) या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेल्या भूखंडाचे विभाजन करता येणार नाही. परंतू सदर अटीचा भंग केला असे आढळून आल्यास आवेदकावर दंडात्मक कार्यवाही म्हणून अकृषक आकारणी एवढा दंड भरुन भूखंडाचे विभाजन करता येईल. भूखंडाचे विभाजन करुन विक्री करुन देण्यापूर्वी भूखंड विभाजनाची परवानगी घेवूनच भूखंडाची विक्री करण्यात यावी त्याशिवाय भूखंड विभाजनाची मंजूरी देण्यात येणार नाही.

४) अभिन्यासातील संपूर्ण भूखंडाचा वापर (सार्वजनिक प्रयोजनकरीता खुली जागा व्यतीरीक्त) निवासी प्रयोजनाकरीताच करावा. स्थानिक प्राधिकरणाच्या विकास योजनेप्रमाणे निवासी भूखंडाचे वापरास परवानगी असेल.

५) अभिन्यासातील एकुण **क्षेत्रफळाच्या १२२०.०० चौ.मी.** व **३४०.०० चौ.मी.** आरक्षीत म्हणून मोकळी / खुली ठेवतील, त्यापेक्षा अधिक जागा ठेवता येणार नाही. सदर जागा स्थानिक प्राधिकरणास पुढील व्यवस्थे करीता हस्तांतरीत करतील.

६) अभिन्यासातील भूखंड प्रत्यक्ष जागेवर मोजणी /सिमांकन करुन १५०.०० चौ.मी.पेक्षा कमी नसेल व अभिन्यासातील रस्त्याजवळ व लागुन असलेले सर्व्हे नं.समांतर व योग्य रितीने जोडतील.

७) आवेदकाने लेआऊट विकसीत करावा विकसीत केल्याचे या कार्यालयास कळवावे.

८) अभिन्यासातील रस्ते/मो-या व नाल्याचे बांधकाम आवेदक करतील.सदर सुवीधा करुन घेण्याची जबाबदारी **दिग्रस नगर परिषदेची** राहील व सुविधा असल्याबाबतची खात्री करुन घेण्याची जबाबदारी ही भूखंड खरेदी करणा-याची राहील.

९) आवेदकास अभिन्यासातील भूखंडाचा व्यवहार कोणत्याही प्रकारच्या काल्पनिक अथवा सट्टाबाजीसाठी करता येणार नाही.

१०) आवेदक हे अभिन्यासातील जागेवर १००.०० चौ.मी.करीता कमीत कमी एक झाड याप्रमाणे मंजूरी आदेशाप्रमाणे एक वर्षाच्या आंत झाडाची लागवड करुन निगा राखतील. जर सदर अटीचा भंग केल्या दरवर्षी अकृषीक आकारणी एवढी रक्कम दंड म्हणून भरणा करावी लागेल.

११) आवेदक, सहा.संचालक नगर रचना, यवतमाळ, व इतर विभाग यांनी घालून दिलेल्या सर्व शर्ती व अटीचे पालन करतील.

१२) अभिन्यासातील आरोग्याचे दृष्टीने योग्य अशा नाल्या व मो-या बांधून घेण्याची जबाबदारी **दिग्रस नगर परिषदेची** राहील. व सुविधा असल्याबाबतची खात्री करुन घेण्याची जबाबदारी भूखंड खरेदी करणा-याची राहील.

१३) अभिन्यासातील भूखंड व त्यावरील इमारत जर आवेदकाने विकला किंवा परस्पंर निकालात काढला तर या आदेशाची नोंद खरेदी खतात घेणे बंधनकारक राहील.

१४) मंजूर अभिन्यासातील भूखंडावर इमारतीचे बांधकाम स्थानिक प्राधिकरणाचे मंजूरी शिवाय करण्यात येवू नये.उर्वरीत मोकळया जागेवर कोणतेही बांधकाम करु नये .व ते मोकळे किंवा खुले ठेवावे लागतील.

१५) आवेदक मंजूर आदेशापासून एक वर्षाचे आंत अभिन्यासातील अकृषीक वापर सुरु करतील किंवा सक्षम अधिका-यांकडून मुदत वाढवून घेतील. मुदत वाढ न घेता जागेचा अकृषीक वापर सुरु केला असेल तर मंजूरी आदेश आपोआप रद्द होईल व त्याबाबतची जबाबदारी आवेदकावर राहील.

१६) आवेदकास मंजूर अभिन्यासातील भूखंडावर प्रस्तावित इमारत किंवा दुसरे बांधकाम करण्यापूर्वी स्थानिक प्राधिकरणाची व नगर रचना विभागाची परवानगी घ्यावी लागेल. मंजूर बिल्डींग प्लॅन प्रमाणेच बांधकाम करावे लागेल.

१७) आवेदक, अकृषीक वापर सुरु केल्याचा दिनांक तहसिलदार, **दिग्रस** यांना देवून तलाठी, **दिग्रस** मार्फत कळवतील.

१८) आवेदकास ज्या प्रयोजनाकरीता जागेचा वापर सुरु केला असेल त्या दिनांका पासून मंजूर दराप्रमाणे निवासी प्रयोजनाकरीता रुपये २.५० चौ.मी.प्रमाणे आकारणीचा भरणा करावा लागेल.

**--परिशिष्ट --**

| अ. क्र. | तपशिल | क्षेत्रफळ चौ.मि | अकृषीक आकारणी निवासी प्रयोजना साठी प्रति चौ.मी.२.५० प्रमाणे रु.पै. |
|---|---|---|---|
| १ | निवासी भूखंडाखालील क्षेत्रफळ | ७०५१.५२ | १७६२९/- |
| २ | मोकळया/ खुल्या जागेचे क्षेत्रफळ | १२२०.०० | |
| ३ | रस्त्याखालील क्षेत्रफळ | ३९२८.४८ | |
| | एकुण | १२०००.०० | १७६२९/- |

**--परिशिष्ट --**

| अ. क्र. | तपशिल | क्षेत्रफळ चौ.मि | अकृषीक आकारणी निवासी प्रयोजना साठी प्रति चौ.मी.२.५० प्रमाणे रु.पै. |
|---|---|---|---|
| १ | निवासी भूखंडाखालील क्षेत्रफळ | २६२७.२७ | ६५६८/- |
| २ | मोकळया/ खुल्या जागेचे क्षेत्रफळ | ३४०.०० | |
| ३ | रस्त्याखालील क्षेत्रफळ | ४३२.७३ | |
| | **एकुण** | **३४००.००** | ६५६८/- |

१९) वार्षीक अकृषीक आकारणी रुपये १७६२९/- अक्षरी (रुपये सतरा हजार सहाशे एकोणतीस फक्त) व ६५६८/- (अक्षरी रुपये सहा हजार पाचशे अडुसष्ट ) दिनांक १.८.२०१७ ते ३१.७.२०१८ या कालावधीसाठी राहील.

२०) सदर अभिन्यास हा **क वर्ग** नगर परिषदेच्या परिघातील हद्दीत येत असल्यामुळे कलम ४७ अ नुसार परावर्तीत कर लागु होत नाही.

२१) दर पांच वर्षानी पुनर्विलोकन होईल त्यावेळी शासन राजपत्रात प्रसिध्द झालेल्या दरानूसार सुधारीत रक्कम व फरकाची रक्कम भरणा करणे, आवेदकास बंधनकारक राहील.

२२) आवेदकाने शासनाच्या सुधारीत आदेशाप्रमाणे मोजणी फी (भूखंड निहाय) चा भरणा केला आहे व तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, **दिग्रस** यांनी अभिन्यासा प्रमाणे भूखंडाची मोजणी करुन दिलेली आहे.

२३) भूखंडाधारकाने मंजूर प्लॅनप्रमाणे बांधकाम केले असल्यास त्यात पुन्हा सुधारणा वा बदल करावयाचा असल्यास सक्षम अधिका-याचे पूर्व परवानगी शिवाय बांधकाम करता येणार नाही.

२४) आवेदक, वरील नियमावलीतील परिशिष्टाप्रमाणे सनद तयार करुन देतील व एक महीन्याचे आंत अकृषीक वापर सुरु करतील.

२५) आवेदकांनी आदेशातील कोणत्याही अटी व शर्तीचा भंग केल्यास दिलेली परवानगी रद्द केली जाईल, किंवा अकृषीक आकारणी एवढा दंड भरणा करावा लागेल.

२६) अकृषीक आकारणी बाबत **परिशिष्ट एक** सोबत जोडले आहे.

२७) वरील पैकी कोणत्याही अटी किंवा शर्तीचा भंग झाला असे आढळुन आल्यास अनधिकृत बांधकाम समजण्यात येवून विहीत मुदतीत बांधकाम काढले जाईल व त्यावर आलेला खर्च आवेदकाकडून जमीन महसूलाची थकबाकी म्हणून वसूल केला जाईल.

२८) या आदेशान्वये मंजूर करण्यात आलेली अकृषीक परवानगी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ व महाराष्ट्र जमीन महसूल (जमीनीच्या वापरात बदल व अकृषीक आकारणी) नियम १९६९ च्या तरतुदी खाली देण्यात आलेली आहे.

२९) प्लॉट क्र. १ ते ३२ श्रीमती खुर्शीद बानो सै. मुर्तीजा यांचे नावे असून प्लॉट क्रमांक ३३ ते ४३ सौ. रश्मी संजय बंग , व सौ. सुजाता निखील महिंद्रे (पाटील) यांचे नावे राहील.

ज्याअर्थी उपरोक्त सर्वे नंबरची मंजूर अभिन्यासानुसार तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख यांचेकडून मोजणी करुन उपरोक्त प्रमाणे अभिन्यासाला अंतीम मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे आणि ज्याअर्थी महसुल व वन विभागा परिपत्रक क्रमांक- आरएएम- १०९०/(२१०४)/ल-६ दिनांक-२७.१२.९० तसेच जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमी अभिलेख(म.रा.) पुणे यांचे परिपत्रक क्रमांक-एलआर-२२७/सीआर-३०४९/भू-३/२००१ दिनांक- २० जानेवारी २००१ नुसार ज्या जमिनींना अकृषीक परवानगी देण्यात येते, त्या जमिनीचे बाबत सिटी सर्व्हे ऑफीस कडून भूखंड निहाय मिळकत पत्रीका (Proparty Card) तयार करणे आवश्यक आहे. त्याअर्थी सिटी सर्व्हे ऑफीसर यांनी उपरोक्त अंतीमरित्या मंजूर अभिन्यासाचे भुखंड निहाय मिळकत पत्रिका तयार करुन त्याची प्रत्येकी एक प्रत प्रकरणात अभिलेखा करिता पाठवावी,

जास्त पत्रक तात्काळ तयार करुन अभिलेखा करीता या कार्यालयाकडे तसेच संबंधीत तलाठी यांचेकडे पाठविण्यात यावे आणि संबंधीत तलाठी यांनी प्राप्त कमी जास्त पत्रकानुसार संबंधीत गाव नमुन्यामध्ये नोंद घेऊन या कार्यालयास कळवावे, असे आदेशित करण्यात येत आहे.

(चंद्रकांत जाजू)
**अपर जिल्हाधिकारी यवतमाळ**

क्रमांक/अका/अकृषक/कावि/ २५८ /२०१८
अपर जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे कार्यालय
दिनांक ७ /३ /२०१८

**प्रतिलीपी :- माहीती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित**

१) उपविभागीय अधिकारी, दारव्हा
२) तहसिलदार, दिग्रस
३) सहाय्यक संचालक, नगर रचना, यवतमाळ
४) तलाठी, दिग्रस, मार्फत तहसिलदार, दिग्रस
५) मुख्याधिकारी, नगर परिषद, दिग्रस
६) तालुका निरीक्षक भूमी अभिलेख, दिग्रस
७) दुय्यम निबंधक, दिग्रस
८) १) श्रीमती खुर्शीद बानो सै. मुर्तीजा २) सौ. रश्मी संजय बंग ३) सौ. सुजाता निखील महिंद्रे (पाटील) सर्व रा. दिग्रस ता. दिग्रस

**अपर जिल्हाधिकारी यवतमाळ**

# परिशिष्ट १

जा दिग्रस ता. दिग्रस येथील शे स.न.२०/२ पै हे.आर. जमिन

निवासी उपयोगीकामाकरीता मंजुर केलेले भुखंडनिहाय वार्षिक अकृषक आकारणी दर रु. २.५० पै प्रति चौ मि

| भुखंड क्रं | एकुण भुखंड | प्रत्येक भुखंडाचे क्षेत्रफळ चौ मि | एकुण भुखंडाचे क्षेत्र चौ मि | वार्षीक प्रत्येक भुखंडाचे अकृषीक आकारणी रक्कम रु | अकृषीक आकारणी दर प्रति चौ मि प्रमाणे ( २.५० पै) चौ मि वार्षीक अकृषीक आकारणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | ६७९.५४ | ६७९.५४ | १६९८.८५ | १६९८.८५ |
| [illegible] | १ | ६७४.३३ | ६७४.३३ | १६८५.८३ | १६८५.८३ |
| ३ | १ | २७८.०१ | २७१.९६ | ६९५.०३ | ६७९.९० |
| ४ | १ | २३८.८२ | २३८.८२ | ५९७.०५ | ५९७.०५ |
| ५ | १ | २४०.१० | २४०.१० | ६००.२५ | ६००.२५ |
| ६ | १ | २५८.५० | २५४.१५ | ६४६.२५ | ६३५.३८ |
| ७ | १ | १४०.०० | १३५.६५ | ३५०.०० | ३३९.१३ |
| १५ | १ | १७९.८९ | १७५.३९ | ४४९.७३ | ४३८.४८ |
| १६ TO १८ | ३ | १६४.०० | ४९२.०० | ४१०.०० | १२३०.०० |
| १९ | १ | १६७.०८ | १६७.०८ | ४१७.७० | ४१७.७० |
| २० | १ | १४०.२५ | १४०.२५ | ३५०.६३ | ३५०.६३ |
| २१ & २२ | २ | १४६.२५ | २९२.५० | ३६५.६३ | ७३१.२५ |
| २३ | १ | १६६.१३ | १६१.७८ | ४१५.३३ | ४०४.४५ |
| २४ | १ | १६०.८८ | १५६.५३ | ४०२.२० | ३९१.३३ |
| २५ & २६ | २ | १४६.२५ | २९२.५० | ३६५.६३ | ७३१.२५ |
| २७ | १ | १३६.८८ | १३६.८८ | ३४२.२० | ३४२.२० |
| २८ | १ | १७३.७० | १७३.७० | ४३४.२५ | ४३४.२५ |
| २९ & ३० | २ | १७१.०० | ३४२.०० | ४२७.५० | ८५५.०० |
| ३१ | १ | १७४.६० | १७०.२५ | ४३६.५० | ४२५.६३ |
| ३२ | १ | १०८५.३६ | १०८५.३६ | २७१३.४० | २७१३.४० |
| A) Total Of Regular Plots | २५ | | ६२८०.७७ | ०.०० | **१५७०१.९३** |
| ८ TO १३ | ६ | ११०.०० | ६६०.०० | २७५.०० | १६५०.०० |
| १४ | १ | ११०.७५ | ११०.७५ | २७६.८८ | २७६.८८ |
| B) Total Of Row Housing Plots | ७ | | ७७०.७५ | ०.०० | **१९२६.८८** |
| **एकुण A+B** | **३२** | | **७०५१.५२** | | **१७६२९** |

१ निवासोपयोगी जमीनीचे क्षेत्रफळ ७०५१.५२ चौ मि

२ वार्षीक अकृषीक आकारणी रु १७६२९/- ( रु स्सतरा हजार सहाशे एकोणतीस रुपये फक्त )

| भुखंड क्रं | एकुण भुखंड | प्रत्येक भुखंडाचे क्षेत्रफळ चौ मि | एकुण भुखंडाचे क्षेत्र चौ मि | वार्षीक प्रत्येक भुखंडाचे अकृषीक आकारणी रक्कम रु | अकृषीक आकारणी दर प्रति चौ मि प्रमाणे ( २.२० पै) चौ मि वार्षीक अकृषीक आकारणी |
|---|---|---|---|---|---|
| ३३ | १ | ४५१.६१ | ४५१.६१ | ११२९.०३ | ११२९.०३ |
| ३४ | १ | १२५.०० | १२५.०० | ३१२.५० | ३१२.५० |
| ३५ | १ | १४२.३४ | १४२.३४ | ३५५.८५ | ३५५.८५ |
| ३६ | १ | ५१५.३२ | ५१५.३२ | १२८८.३० | १२८८.३० |
| ३७ | १ | १५३.७५ | १५३.७५ | ३८४.३८ | ३८४.३८ |
| ३८ | १ | १५०.०० | १५०.०० | ३७५.०० | ३७५.०० |
| ३९ | १ | १६१.६३ | १५८.४९ | ४०४.०८ | ३९६.२३ |
| ४० | १ | १२८.४५ | १२५.३१ | ३२१.१३ | ३१३.२८ |
| ४१ | १ | १२५.३० | १२५.३० | ३१३.२५ | ३१३.२५ |
| ४२ | १ | २३४.५० | २३०.१५ | ५८६.२५ | ५७५.३८ |
| ४३ | १ | ४६०.४० | ४५०.०० | ११५१.०० | ११२५.०० |